# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 17.09.2026** **वार : गुरुवार**

---

1. देशभरात आजपासून सेवा संकल्प अभियानाला सुरुवात
2. नवी दिल्लीत आज 'सेमिकॉन इंडिया 2026' चं उद्घाटन
3. पीएफसाठीच्या वेतनमर्यादेत 15 हजार रुपयांवरून 25 हजारपर्यंत वाढ
4. भारताकडून पाकिस्तानस्थित शहजाद भट्टी नेटवर्क ही दहशतवादी संघटना म्हणून घोषित
5. ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांनादादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर आणि
6. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील वीस षटकांच्या मालिकेतला तिसरा आणि अंतिम सामना आज

**सेमिकॉन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीतल्या यशोभूमी इथं 'सेमिकॉन इंडिया 2026' चं उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमात पंतप्रधान उपस्थितांना संबोधितही करतील. 'सिलिकॉन टू सिस्टिम्स: बिल्डिंग द इकोसिस्टम' या मध्यवर्ती संकल्पनेवर ही परिषद होणार आहे. तीन  दिवस चालणाऱ्या या परिषदेत सेमिकंडक्टर आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील मूल्य साखळीशी संबंधित जागतिक तसंच भारतीय कंपन्या, धोरणकर्ते, गुंतवणूकदार, संशोधक, स्टार्ट-अप्स, शैक्षणिक संस्था आणि विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

**सेवा संकल्प- स्टार्टअप इंडिया**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सार्वजनिक जीवनातील कारकिर्दीला 25 वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त शासकीय योजना आणि सेवा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी आज त्यांच्या वाढदिवसापासून 17 ऑक्टोबरपर्यंत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येणार आहे. या विशेष 'सेवा संकल्प अभियान' मालिकेत आपण या संकल्पनेतून प्रत्यक्ष कृतीत उतरलेल्या स्टार्टअप इंडिया उपक्रमाबाबत जाणून घेणार आहोत...

**2016 मध्ये सुरु करण्यात आलेल्या 'स्टार्टअप इंडिया' उपक्रमाचा उद्देश भारतातील उद्योजकतेची संस्कृती बदलणे हा होता. 400 मान्यताप्राप्त स्टार्टअप्सपासून हा प्रवास सुरु झाला होता. मार्च 2026 पर्यंत डीपीआयआयटीकडून मान्यताप्राप्त स्टार्टअप्सची संख्या 2 लाखांहून अधिक झाली असून, 23 लाखांपेक्षा अधिक प्रत्यक्ष रोजगार निर्माण केले आहेत. या परिवर्तनाचे नेतृत्व महिलाही वाढत्या प्रमाणात करत आहेत. मार्च 2026 पर्यंत 1 लाखांहून अधिक मान्यताप्राप्त स्टार्टअप्समध्ये किमान एका महिलेचा संचालक किंवा भागीदार म्हणून सहभाग होता. 'स्टार्टअप इंडिया'ने उद्योजकतेला मोजक्या लोकांसाठीची संधी न ठेवता एक व्यापक आकांक्षा बनवली आहे. तसेच, नवोन्मेष आता देशव्यापी चळवळ बनला आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, प्रशांत जाधव पुणे.**

देशभरात आजपासून 'स्वच्छता ही सेवा' अभियानही सुरु होत आहे. 17 ऑक्टोबरपर्यंत हे अभियान सुरू राहील. 'स्वच्छतेत सहयोग, स्वच्छ भारत, विकासित भारत' ही या वर्षीच्या मोहिमेची संकल्पना आहे. या संपूर्ण काळात देशभरात 12 कार्यक्रम आयोजित केले जाणार असून यामधून राष्ट्र उभारणी आणि सेवा कार्यांवर भर दिला जाणार आहे.

**राज्यसेवा संकल्प**

दरम्यान महाराष्ट्र शासनानंही राज्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या अभियानातून लोकाभिमुख प्रशासन हा महिनाभराचा उपक्रम राबवण्यात येणार आहे. या माध्यमातून सरकारी सेवा आणि योजना सामान्य माणसाच्या अधिक जवळ नेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. प्रत्येक तालुक्यात 'सेवा सेतू' शिबिरे आयोजित करून विविध शासकीय योजनांचे लाभ पात्र नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**ईपीएफओ**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना अर्थात ईपीएफओ अंतर्गत अनिवार्य समावेशासाठी असलेली वेतन मर्यादा केंद्र सरकारनं 15 हजार रुपयांवरून 25 हजार रुपये केली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. केंद्र सरकारनं जवळपास 12 वर्षांनी किमान वेतनाची मर्यादा वाढवली आहे. त्यामुळं 51 लाख कर्मचाऱ्यांना कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेचे विविध लाभ मिळणार आहेत. या अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या वेतनातून 12 टक्के रक्कम पीएफ खात्यात जमा केली जाईल. त्यांच्या नियोक्त्याला तितकीच रक्कम त्या खात्यात भरावी लागेल.

**यूएन-एआय**

संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानापासूनच्या धोक्यांना तोंड देण्यासाठी या क्षेत्रातील जागतिक स्पर्धकांना सहकार्य करण्याचं आवाहन केलं आहे. एआयच्या सुरक्षेच्या बाबतीत जगाला अधोगतीची स्पर्धा परवडणार नाही. तसंच एआयच्या धोक्यांपासून नागरिकांचं संरक्षण करण्याची पहिली जबाबदारी सरकारांनी स्वीकारली पाहिजे, असंही गुटेरेस यांनी म्हटलं आहे. ते काल अँथ्रोपिकचे सीईओ डारियो अमोडेई यांच्या एका प्रस्तावाचा संदर्भ देत पत्रकारांशी बोलत होते.

**शहजाद नेटवर्क**

भारत सरकारनं पाकिस्तानस्थित शहजाद भट्टी नेटवर्क ला बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायदा म्हणजेच यूएपीएअंतर्गत दहशतवादी संघटना म्हणून घोषित केलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल समाजमाध्यमावरून ही माहिती दिली. ही संघटना सीमापार शस्त्र, स्फोटकं आणि अमली पदार्थांच्या तस्करीमध्ये सक्रिय असून, दहशतवादी गट तसंच किरकोळ गुन्हे करणाऱ्या युवकांना दहशतवादाकडे वळवण्याचे काम करत होती. तसंच ही संघटना देशाची लोकशाही, सामाजिक सलोखा आणि अंतर्गत सुरक्षा धोक्यात आणण्यासाठी द्वेषयुक्त डिजिटल माहिती प्रकाशित करत होती, असं शहा यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे

**पकिस्तान-चीन सीमा-भारत**

पाकिस्तानच्या बेकायदेशीर आणि बळजबरीनं केलेल्या ताब्यातील भारतीय भूभागाबाबत कोणत्याही प्रकारची व्यवस्था किंवा करार करण्याचा पाकिस्तानला कोणताही कायदेशीर अधिकार नाही, असं सांगत भारतानं तथाकथित 'पाकिस्तान-चीन सीमा संयुक्त आयोग' फेटाळून लावला आहे. याबाबत प्रसारमाध्यमांशी बोलताना परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं की, पाकिस्तान आणि चीन यांच्यात कोणतीही सामायिक सीमा नाही. तसंच 1963 मधील तथाकथित 'चीन-पाकिस्तान सीमा करार' भारतानं कधीही मान्य केलेला नाही. जम्मू-काश्मीर आणि लडाख हे संपूर्ण केंद्रशासित प्रदेश भारताचे अविभाज्य आणि अतूट भाग आहेत असंही जयस्वाल यांनी ठामपणे सांगितलं.

**फाळके पुरस्कार**

ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रदीर्घ आणि गौरवशाली कारकिर्दीसाठी 2024 चा प्रतिष्ठित दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने काल ही घोषणा केली. येत्या 22 सप्टेंबर रोजी गुजरातमधील केवडिया येथे होणाऱ्या 72 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात अनंत नाग यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाल्याबद्दल ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केलं आहे.

**फिल्म सर्टिफिकेशन**

केंद्र सरकारनं 'केंद्रीय चित्रपट प्रमाणपत्र मंडळ म्हणजेच सेन्सॉर बोर्डची पुनर्रचना केली असून, हा निर्णय तात्काळ प्रभावानं तीन वर्षांच्या कालावधीसाठी लागू करण्यात आला आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, या पुनर्रचित मंडळात विनोद अनुपम, मनोज जोशी, हंसराज हंस, प्रीती झिंटा, पंकज त्रिपाठी, रिकी केज, सुनील शेट्टी, रूपाली गांगुली आणि प्रियदर्शन यांच्यासह 18 सदस्यांचा समावेश आहे.

**नबीन-फडणवीस**

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी काल पुण्यातील मानाचा कसबा गणपती आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेऊन पूजा केली. यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

**<u>मराठवाडा मुक्तीसंग्राम</u>**

हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन आज साजरा होत आहे. 17 सप्टेंबर 1948 रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या राजवटीतून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात विलीन झालं. हैदराबाद प्रांतातला मराठवाडा हा भाग महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात आला. मराठवाड्यात सर्वत्र मुक्तिसंग्राम दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं सिद्धार्थ उद्यानातल्या स्मृतिस्तंभ परिसरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण होणार आहे. परभणी, धाराशिव, नांदेड इथं या जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे.

**<u>विश्वकर्मा जयंती</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज साजऱ्या होत असलेल्या विश्वकर्मा जयंतीनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. याप्रसंगी, बांधकाम आणि तत्सम क्षेत्रांत कार्यरत असलेल्या देशभरातील कारागीर आणि कुशल कामगारांनाही त्यांनी शुभेच्छा दिल्या. विकसित आणि आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांचे कौशल्य आणि कठोर परिश्रम अत्यंत महत्त्वाचे आहेत असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

**<u>चित्ते</u>**

भारतातील चित्त्यांची संख्या आता 52 झाली असून यामध्ये देशात जन्मलेल्या 32 बछड्यांचाही समावेश आहे. यातील 49 चित्ते सध्या मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात तर तीन चित्ते गांधी सागर येथील अभयारण्यात आहेत. चित्ते पुनर्वसन कार्यक्रमाच्या आढाव्यानुसार, गेल्या 4 वर्षातली ही संख्या आहे. यामध्ये नामिबिया, दक्षिण आफ्रिका आणि बोत्सवाना मधून आणण्यात आलेल्या चित्त्यांचाही समावेश आहे. प्रजननक्षम मादी चित्त्यांचे स्थिरीकरण आणि दुसऱ्या पिढीतील पिल्लांचं जीवंत राहणं ही भारतातील चित्ते पुनर्वसन कार्यक्रमाच्या सशक्तीकरणाची पायरी आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि अफगाणिस्तान क्रिकेट संघांमध्ये टी ट्वेंटी मालिकेतला तिसरा आणि अंतिम सामना आज नवी दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडीयममध्ये होणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी साडे सात वाजता सुरू होईल. तीन सामन्यांच्या मालिकेत भारतानं 2-0 अशी विजयी आघाडी घेतली आहे.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागाने आज बिहार, पश्चिम बंगाल, केरळ, माहे, तामिळनाडूसह ईशान्य भारतातील काही भागांत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तसंच, जम्मू-काश्मीर, हरियाणा, चंदीगड, पंजाब, उत्तराखंड, झारखंड, छत्तीसगड, राजस्थान आणि गुजरातमध्ये विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह वादळाची शक्यता आहे. दिल्लीत आज आकाश अंशतः ढगाळ राहील तसंच सकाळच्या वेळी काही ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार